महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृहशाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 मे, 2020, दिनांक 19 मे, 2020, दिनांक 31 मे, 2020, दिनांक 25 जून, 2020, दिनांक 29 जून, 2020, दिनांक 06 जुलै, 2020, दिनांक 29 जुलै, 2020, 31 ऑगस्ट, 2020, दिनांक 30 सप्टेंबर, 2020, दिनांक 14 ऑक्टोंबर, 2020, दिनांक 23 ऑक्टोंबर, 2020 व दिनांक 29 ऑक्टोंबर, 2020, दिनांक 03 नोव्हेंबर, 2020, दिनांक 14 नोव्हेंबर, 2020, दिनांक 23 नोव्हेंबर, 2020, दिनांक 27 नोव्हेंबर, 2020 व दिनांक 21 डिसेंबर, 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/542 , दिनांक 28 नोव्हेंबर, 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/551 , दिनांक 22 डिसेंबर, 2020
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 29 डिसेंबर, 2020 व दिनांक 29 जानेवारी, 2021
8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/553 , दिनांक 30 डिसेंबर, 2020
9. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/569 , दिनांक 29 जानेवारी, 2020
10. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 24 फेब्रुवारी, 2021

---0000---

क्रमांक दंडप्र-01/कावि/2021/583 दिनांक 01 मार्च, 2021

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 29 जानेवारी, 2021 व या कार्यालयाचे आदेश दिनांक 29 जानेवारी, 2021 अन्वये जळगांव जिल्हयाकरीता लॉकडाऊन कालावधी दिनांक 28 फेब्रुवारी, 2021 पावेतो वाढविण्यात आलेला असून लॉकडाऊन कालावधीत लागू करण्यात आलेले निर्बंध शिथील करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 24 फेब्रुवारी, 2021 अन्वये जळगांव जिल्हयाकरीता लॉकडाऊन कालावधी दिनांक 31 मार्च, 2021 पावेतो वाढविण्यात आलेला असून लॉकडाऊन कालावधीत लागू करण्यात आलेले निर्बंध शिथील करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासन

आदेश दिनांक 24 फेब्रुवारी, 2021 मध्ये नमूद केल्यानुसार जळगांव जिल्हयाकरीता लॉकडाऊन कालावधी **दिनांक 31 मार्च**, 2021 पावेतो वाढविण्याबाबत आदेश पारीत करीत आहे.

**कोरोना विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश, निर्देश, नियमावली (SOPs) नुसार या कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश लागू राहतील. तसेच महाराष्ट्र शासनाकडून लॉकडाऊन कालावधीत लागू केलेले निर्बंध शिथील करण्याबाबत वेळोवेळी दिलेले निर्देश पुढील आदेश होईपावेतो लागू राहतील.**

सदरचा आदेश उपोद्घातात नमूद संदर्भ क्र. 09 महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 24 फेब्रुवारी, 2021 सोबत वाचावेत.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक 01 /03/2021 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**सहपत्र : महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 24 फेब्रुवारी, 2021**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
7. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि प जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
11. विमानपत्तन निदेशक, भारतीय विमानतळ प्राधिकरण जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.